SPECIAL ISSUE No. 105

ISSN 2349-638x
Impact Factor 7.149

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY
RESEARCH JOURNAL
PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

# गेल्या दोन दशकांतील मराठी कथालेखन

Chief Editor
Shri. Pramod Tandale

Executive Editor
Prof. Dr. Sunita Shinde

Co-Editor
Prof. Dr. Ramchandra Kalunkhe

Shaikshnik Sanstha's Arts, Commerce & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 17. | डॉ. ज्ञानेश्वर खिल्लारी<br>प्रा. बाळासाहेब गायके | समकालीन स्त्रीवादी कथालेखन | 72 |
| 18. | प्रा. सुनिल रामराव काकडे | जागतिकीकरण आणि स्त्रियांचे कथालेखन | 76 |
| 19. | स्वाती संतोषराव भोजने | नव्वदोत्तर स्त्रीलिखित कथालेखन : काही निरीक्षणे | 79 |
| 20. | दिपक रायभान कारके | समकालीन दलित कथेतील सामाजिक वास्तव | 83 |
| 21. | डॉ. गणेश मोहिते | मराठी ग्रामीण कथेतील स्थित्यंतरे | 88 |
| 22. | डॉ. सखाराम डाखोरे | समकालीन आदिवासी कथा | 98 |
| 23. | डॉ. सरला गोरे | भटक्या विमुक्तांचे कथात्मलेखन | 103 |
| 24. | विनोद पांडुरंग सिनकर | बबन शिंदे यांची बालकथा | 106 |
| 25. | स्वामी दत्तात्रय बोबडे | समकालीन काही ग्रामीण कथालेखक | 110 |
| 26. | डॉ. लिंगप्पा गुळाळे | गेल्या दोन दशकातील लक्ष्यणीय कथालेखक | 114 |
| 27. | प्रा. डॉ. जनार्दन काटकर | समकालीन कथाकार : सदानंद देशमुख | 120 |
| 28. | डॉ. प्रवीण घारपुरे | कथाकार सदानंद देशमुख | 12 |
| 29. | डॉ. बी. जी. श्रीरामे | आसाराम लोमटे : विलक्षण कथालेखक | 12 |
| 30. | डॉ. रामचंद्र झाडे | आसाराम लोमटे : समकालीन ग्रामवास्तव टिपणारा कथाकार | 1 |
| 31. | प्रा. डॉ. युवराज धबडगे | समकालीन मराठी दलित कथा | |
| 32. | प्रा. कैलास कळकटे | बदलते समाजवास्तव आणि कथालेखिकांच्या लेखनातील स्त्रीप्रतिमा | |
| 33. | डॉ. ज्ञानेश्वर सखाराम गवळीकर | 'भूप' : कथासंग्रहाचा वाङ्मयीन अभ्यास | |
| 34. | डॉ. समिता जाधव | समकालीन[illegible]व आणि पिवळा पिवळा पाचोळा | |



Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

# बदलते समाजवास्तव आणि कथालेखिकांच्या लेखनातील स्त्रीप्रतिमा

- प्रा. कैलास कळकटे
मराठी विभाग प्रमुख
जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी
ता. शहापूर जि. ठाणे

मराठी कथा वाङ्मयाच्या वाटचालीत स्त्रीलेखिकांनी दिलेले योगदानाबद्दल महत्त्वपूर्ण आहे. शांताबाई या लेखिकेने लिहिलेली 'बिचारी आनंदीबाई ' ही पहिली उपलब्ध स्त्रीलेखिकेची कथा तर १९१५ साली लक्ष्मीबाई अभ्यंकर यांचा 'सद्य स्थिती' हा पहिला कथासंग्रह. ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर स्त्री कथालेखिकांच्या लेखनाने शतक पार केले आहे. या शतकभरातील तिच्या कथेने मराठी कथेला समृध्द केले. प्रारंभीच्या कालखंडात बाळबोध किंवा उपदेशपर असलेली कथा. आता मात्र तिचे खास अनुभव मांडताना दिसत आहे. कारण ही 'तिची' कथा आहे. ह्या 'ती' चं कोणतंही एक विशिष्ट नाव नाही. 'स्त्री' हीच तिची ओळख. आयुष्यभर तिला सोबत फक्त नानाविध दु:खांची ! धर्माच्या नावाखाली तिचा छळ मांडणाऱ्या जाचक परंपरा खंडित झाल्या खऱ्या, पण प्रश्न संपले नाहीत. जगण्याच्या नव्या पद्धतीतून तिच्यासाठी नवे प्रश्न निर्माण होतच राहिले. यातनांचे, पीडेचे प्रकार बदलले पण दु:खाची जात तीच - जीवघेणी ! तिचं शिक्षण, तिचं आर्थिक स्वावलंबन, तिचं कर्तृत्व - सगळं खोटं ! खरं फक्त तिचं 'स्त्री' असणं. ती अडाणी कामकरी असो अथवा वकील, डॉक्टर, इंजीनियर असो, तिच्या तिच्या स्तरात तिला भेटणारा पुरुष आणि त्याचा समाज तिची छळणूक करीतच राहिला. स्त्रीच्या जगण्याचा गेल्या शंभर वर्षांचा हा साहित्यिक इतिहास म्हणजे खरं तर प्रत्येकीची कथा."१ कारण प्रत्येक लेखिकेने आपल्या अनुभव विश्वाच्या माध्यमातून मराठी कथेला समृध्द केले. कथालेखिकांच्या स्त्रीप्रतिमा अतिशय आशयगर्भ आहेत. त्यामुळेच समकालीन कथालेखिकांच्या लेखनातील स्त्री प्रतिमा व त्यातून व्यक्त झाले स्त्री जीवन यांचा शोध प्रस्तृत लेखातून घेतला जाणार आहे. हा शोध घेत असताना पुढीलप्रमाणे निवडक समकालीन कथालेखिकांच्या कथा अभ्यासासाठी निवडलेल्या आहेत. कमल देसाई (रंग ),सानिया ( एक पाऊल पुढे !), गौरी देशपांडे (आता कुठं जाशील टोळंभट्टा ?), ऊर्मिला पवार( शल्य), प्रिया तेंडुलकर (नवा गडी), मेघना पेठे (कॉलनी).

कमल देसाई यांच्या रंग या कथात्रयी मधून भेटणारी सुमित्रा जोशी ही नोकरी करते. वडील वारल्याच्या नंतर संपुर्ण घरादाराची जबाबदारी तिने उचलेली आहे. ही प्रतिमा स्वत्व जपणारी आहे. "रंग या कथात्रयीत कमल देसाई यांनी एकाच व्यक्तीमत्वातील व्दिधाभावाचा ताण कथानिष्ठ केला आहे. या कथेतील सुमित्रा आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर घरातल्या कर्तेपणाची जबाबदारी स्वीकारणे. ही जबाबदारी तिच्या इतकी अंगवळणी पडते की चहू अंगांनी उसळून येणारे सारे रंग उडून जातात. आयुष्याशी तडजोड करून सुमित्रा एक वेगळाच मुखवटा धारण करते. नाकावर बोट ठेवून तिच्यात वावरणाऱ्या या वेगळ्या सुमित्रेने तिला खाऊन टाकले आहे.या वेगळ्या सुमित्रेचा खरी सुमित्रा चमत्कारिक तऱ्हेने द्वेष करते. सुमित्रेला आपल्यातल्या स्वच्छ नितळ अशा मुखवट्यापलीकडच्या ' ती ' ला शोधून काढायचे असते."२ केशव साठे, अण्णा मामा इ. व्यक्तिरेखांच्या माध्यमातून ती स्वत ला शोधत जाते. जगण्याविषयीच्या तिच्या काही धारणा आहेत. परिस्थितीने तिला खूप काही शिकवले आहे. माणसांच्या मुखवट्या मागे लपलेले खरे चेहरे तिला त्रासदायक वाटतात त्याबरोबरच लग्न व्यवस्थेविषयीची चीड आहे.

"तुझ्या बहिणीचं लग्न झालं आहे. निदान आता तरी तू विचार करावास."
"पुन्हा नव्यानं मला आता कशालाही सुरूवात करायची नाही.विश्रांती हवी आहे मला."
"तुला विश्रांती मिळावी म्हणूनच बोलतो आहे मी!"
" एखाद्या कादंबरीचा शेवट करायला हे वाक्य बरं आहे.प्र[illegible] विश्रांती नव्हे.फक्त दगदग आहे."३

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

सानिया यांच्या एक पाऊल पुढे! या कथेतील ऊर्मिला उच्च शिक्षित असून लग्न होण्याच्या अगोदर, ती एक स्त्री म्हणून तिला नोकरी नाकारली जाते त्यावेळी ती तिथे जाऊन भांडते आणि नोकरी मिळवते पण नंतर तिचा बॉस असलेल्या विश्‍वा मध्ये गुंतते आणि त्याच्याशी नंतर लग्नही करते. ती संसारात गुंतत जाते. कालांतराने मुलं, संसार घरदार यांत ती एवढी गुंतून की तिला स्वत:च्या करिअरचा तिला विसर पडतो. आयुष्यात घडणाऱ्या अनेक घटनातून तिला याची सतत जाणीव व्हायला की, ती घरीच असते त्यामुळे तिला दुय्यम स्थान दिल्या जाते किंवा तिच्या कडे दुर्लक्ष केल्या जाते. घरात प्राची (सून) आल्या नंतर ती तिला पुन्हा तिच्या गतकाळातील हुशारीची आठवण करून देते आणि ती उतारवयात निर्भय होते. "तुम्हाला मा आहे का ममी .... तुम्ही फार हुशार होतात म्हणून तुमचं असं झालं. मला बरोबर कल्पना आली आहे. बायकोनं गृहिणी करिअर करून स्वतंत्र बनू नये असं वाटणारे नवरे असतातच. पण तुमचं तसं नाही झालं... तुम्ही हुशार होतात. त्या क्षेत्रात करीत राहिला असतात ना. तर त्यांच्याशीच कदाचित स्पर्धा केली असतील... म्हणून ... म्हणून तिला आठवलं, त्या काळी पंचवीस - सव्वीस वर्षांपूर्वी नव्हतो का आपण धीटपणे विश्वासच्या पुढ्यात कागद टाकून की काय कमी आहे सांगा यात ? मग आताच काय फरक पडला आहे ? केवळ वर्ष, वय ...की नात्याचा ? स्वत: त्याच आता निर्भय बनली.४

गौरी देशपांडे यांच्या आता कुठं जाशील टोळंभट्टा ? या कथेतील निवेदनातील प्रथम पुरुषी नायिका मी ही व्यक्तिमत्त्वाची आहे. आवडीने संपादकीय क्षेत्रात काम करते स्वत:च्या अस्तित्वाविषयीच्या तिच्या ठाम भूमिका आहेत या स्त्रीवादी वाचनातून तयार झालेल्या आहेत. " .... तर ' मॉडर्न' नवऱ्याला साजेशा औदार्यानं त्यानं मला "एकच खातं काढून दोघांचे पैसे ठेवू. असं सांगितलं. मग माझ्या मनात आलं की आपलचं वेगळं खातं काढावं. हे मात्र मी चटकन म्हटलं. पण नाही. जराशाच आश्चर्यानं बघून " जा बँकेत ,आणि माझा रेफरन्स दे " असं म्हटलं. मला खूप बरं वाटलं. स्वतंत्र, निर्णय मिळवती झाल्यासारखं वाटलं."५ धनाबरोबर तिचे लग्न झालेले असून ही, त्याच्या बरोबरचा संसार व्यवस्थित संसार असतानाही ती, ती एका कादंबरीकाराच्या प्रेमात पडते आणि त्याबरोबर तिला वेळ घालवावा असे वाटते त्यात तिला काही वाटत नाही, ही तिला मनाची अवस्था वाटते.

"आपण करतोय हे बरोबर आहे नाही, असं करायचं नसतं, वगैरे विचार माझ्या मनात आले की नाही असं कुणी कि तर मी ठाम सांगू शकेन की खरोखरच ते प्रश्न मी कधी स्वत: विचारले नाही. कारण....हे सर्व 'माझ्या मला'. होतंय. "६

अशाप्रकारे ती मनाला प्राधन्य देते.उर्मिला पवार यांच्या 'शल्य' या कथेत ज्योतीला पाचही मुली असतात. सहाव्या आपल्याला मुलगीच होणार याची तिला खात्री होते. कारण मगील वेळेस जो त्रास बाळंतपणात होतो तसाच यावेळी असतो. पाच मुली आहे म्हणून संसारी तिला त्रास देतात. नवरा देखील दुसरे लग्न करण्याची जाहीर भाषा करत असतो. या त्रासा तून तिला बाहेर पडायचे असते. या दु :खा तून बाहेर पडण्यासाठीची धडपड सुरू असते त्यावेळी तिला तशी संधी येते. त्या संधीचा उपयोग ती माईला हाताशी धरून बाळ बदलून घेते. त्यानंतर तिच्या मनाची होणारी घालमेल व अपराध भावना या कथेतून व्यक्त झाली आहे.

प्रिया तेंडुलकर यांच्या 'नवा गडी' याकथेतील 'मी' ही घटस्फोटीत आहे. असिफ बरोबर तिचा प्रेमविवाह होतो. मुलगाही आहे. तिचा आयुष्यात पुन्हा सुरेश येतो दुसऱ्या लग्नासाठी तिच्या मनाची तयारी झालेली नसताना देखील तो करण्यासाठी तयार करतो. आणि तिने त्याच्या अमेरिकेहून आलेल्या बहीणाला भेटण्याचा आग्रह करतो ती ही द्विधा मनः त्याच्या घरी जाते. तिला घेऊन जाण्यासाठी सुरेश आल्यापासून व त्याच्या घरी जे प्रसंग घडतात त्यावरून तिला या गोष्टीची व्हायला लागते की, आपण हा नवा मांडूच नये कारण तिला कुणाच्याही उपकारा खाली जगायचे नाही तसेच आपल्या व्यक्तिमत्वाला तडाही जाऊ द्याचा नाही"... उद्या सुरेशने माझा धंदा बंद करायचा, हट्टच धरला तर माझी आणि दिपूची जबाबदारीही त्याच्यावरच. हट्टाला पेटून पोटगी आणि दिपूचा खर्च नाकारला मी कारण माझी आर्थिक बाजू बरी होती उपकारावर मला जगायचं नव्हतं. सुरेशशी लग्न झाल्यावर धंदा बंद करून जगायचं ते त्याच्या उपकारावरच ना ?"७

मेघना पेठे यांच्या 'कॉलनी' या कथेतील 'मी' एकटीच राहाते. ती दिसायला सुंदर नाही. नि:संकोचपणे ती शरीराच्या गरजा मान्य करते. "... इतक्या [illegible] ओळखीच्या आणि अनोळखी लोकांविषयी पासून ते कादंबरीतल्या पात्रांपर्यंत मला [illegible] आणि वेगवेगळ्या कालमर्यादा [illegible]



Shaikshanik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

अपरिहार्य नैसर्गिकतेनं. मनाचं कौमार्य वगैरे काही माझ्यात नव्हतं. शरीराचं होतं. तेही नाइलाज म्हणून स्त्रीला ही पुरुषाप्रमाणे शरीराची गरज आहे. तिला ही कोणत्याही पाशात न अडकता ही गरज पूर्ण करावी वाटते. ती ही गरज नमस्कारांविषयीच्या आकर्षणातून व्यक्त केली आहे. या बरोबरच एकटेपणाचे दुःखही व्यक्त केले आहे.

**कथालेखिकांच्या स्त्रीप्रतिमा ठळक वैशिष्ट्ये :**

१) उच्च शिक्षीत स्त्रीप्रतिमा, २) द्विधा मनःस्थिती दिसून येते. ३) स्वावलंबी तरीच , निर्णय.
४) लग्न व्यवस्था, वैधव्य, घटस्फोट याकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन. ५) लग्नसंस्थासंबंधीची बंडखोरी भूमिका.
६) सांसारिकेतेपलिकडचे संबंध. ७) शारिरिक संबंधाकडे गरज म्हणून बघण्याची भूमिका.
८) दडपलेल्या भावजीवनाचे ठळक प्रतिबिंब. ९) जगण्याविषयीचा ठामपणा.

या सारखी अनेक वैशिष्ट्ये नोंदविता येतील.

संदर्भ:

१) आठवलेकर मंगला, प्रस्तावना, तिची कथा ,आवृत्ती तिसरी ऑगस्ट २००९ पृ.१ ,राजहंस प्रकाशन,पुणे
२) वरखेडे मंगला,स्त्रीयांचे कथालेखन ,दु .आवृत्ती २००५,पृ१८३., साकेत प्रकाशन ,औरंगाबाद
३) आठवलेकर मंगला, संपादन तिची कथा ,आवृत्ती तिसरी ऑगस्ट २००९ पृ.३ ,राजहंस प्रकाशन,पुणे
४) उनि पृ १३८
५) उनि पृ १४१
६) उनि पृ १४३
७) उनि पृ १६३

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638x
www.aiirjournal.com

Shaikshnik Sanstha's Arts,Com.& Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601
★ Jeevandeep